CMYK

आठवा सामना

Vs

चेन्नई सुपरकिंग्ज वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु

वेळ : ७.३० वा. स्थळ : चेन्नई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ३९.४

किमान तपमान २२.२

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १७८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# घर परस्पर लिलावात विकल्याचे कळताच धक्क्याने तिने जीव सोडला; प्रेत बँकेसमोर ठेवण्याच्या तयारीने बँक अधिकाऱ्यांचा श्वास रोखला!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

ज्या घरात जन्मलो, खेळलो-बागडलो, लहानाचे मोठे झालो, ज्या घराशी कायमच्या आपलेपणाच्या भावना गुंतलेल्या, ते स्वत:चे घर कर्जाचे हप्ते भरुनसुद्धा बँक ऑफ महाराष्ट्र जुळे सोलापूर शाखेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर ऑनलाईन लिलावातून विकल्याचे कळताच, जोरदार बसलेल्या मानसिक धक्क्यातून भूमिका हरिष वाघमारे (वय २०, रा. आदर्श नगर, विडी घरकुल, लक्ष्मीनारायण टाकीच्या मागे) या दिव्यांग तरुणीचा काल बुधवारी (ता.२६) सायंकाळी पावणेपाच वाजता मृत्यू झाला, असा आरोप करीत मृत तरुणीच्या आई-वडिलांसह नातेवाईकांनी मृतदेह जुळे सोलापूर परिसरातील दावत चौक येथील बँक ऑफ महाराष्ट्र व्टीन सिटी शाखेच्या कार्यालयापुढे नेऊन ठेवण्याची तयारी केली होती.

दरम्यान, संबंधित बँक अधिकाऱ्यांना याची कुणकुण लागताच त्यांनी तातडीने सूत्रे फिरवली. पोलिसांशी संपर्क केला. पुढच्या काही वेळातच एमआयडीसी आणि विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या पोलिसांच्या गाड्या आदर्श नगर, विडी घरकूल येथे पोचल्या. पोलिसांनी मृत भूमिका हिचे प्रेत बँकेच्या समोर ठेवायला नेण्यापूर्वीच नातेवाईकांना अटकाव केला. यादरम्यान या ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. तणाव वाढला. बँक अधिकाऱ्यांच्या मनमानी आणि छळवादाच्या कारभारामुळे भूमिकेचा जीव गेल्याचा आरोप यावेळी तिच्या आई-वडिलांसह नातेवाईकांनी लावला. गुरुवार (ता.२७) सकाळी अकरा वाजलेपासून दुपारी साधारण दोन वाजेपर्यत तिथे गोंधळ होता.

थकित गृहकर्जाचे साधारण ३६ लाखांचे हप्ते भरुनसुद्धा बँकेने परस्पर ऑनलाईन लिलावातून ७१ लाखास घर विकल्याचे काल बुधवारी(ता.२६) वालचंद शिक्षण संकुलात बीएच्या दुसऱ्या वर्षाच्या वर्गात शिकणाऱ्या भूमिकेला नातेवाईकांनी सांगितले तेव्हा तिला मानसिक धक्का बसला आणि त्यातून तिने सकाळी जगाचा निरोप घेतल्याचे मृत भूमिकेचे मामा विठ्ठल माने यांनी सांगितले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या जुळे सोलापूर शाखेच्या अधिकाऱ्यांनी गृहकर्जाचे हप्ते भरूनसुद्धा परस्पर लिलाव काढून घर विकल्याच्या धक्क्यातून भूमिकेचा जीव गेल्याने तिच्या आई-वडिलांसह सगळे नातेवाईक संतप्त झाले. भूमिकेच्या मृत्यू प्रकरणात जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत बँक ऑफ महाराष्ट्र जुळे सोलापूर शाखेच्या कार्यालयासमोरुन भूमिकेचा मृतदेह हलवायचा नाही, अशी भूमिका घेतली होती. मात्र पोलिसांच्या अटकावामुळे मृतदेह संबंधित बँकेच्या कार्यालयासमोर आणला गेला नाही.



मृत भूमिका वाघमारे

## मृत भूमिकेच्या आईने ठोठावले जिल्हाधिकाऱ्यांचे दार, पण...

बँक ऑफ महाराष्ट्र जुळे सोलापूर शाखेने केलेल्या फसवणुकीने भूमिकेचा मृत्यू झाला, असा आरोप शैलाबाई चंद्रकात वाघमारे यांनी करत नातेवाईकांसह जिल्हाधिकारी यांची काल बुधवारी भेट घेतली होती, असे मृत भूमिकेचे मामा अमोल माने यांनी सांगितले. घडलेल्या प्रकाराबद्दल माहिती देऊन याप्रकरणी न्याय देण्याची विनंती केली. शिवाय गुरुवारी (ता.२७) जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन बँक अधिकारी लक्ष्मण डांबर, संजय कुमार,सलीम जावेद यांच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करुन न्याय देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती. न्याय मिळेपर्यंत प्रेत बँकेसमोरुन हलवणार नाही, असे या निवेदनपर पत्रात नमूद केले होते. शिवाय गृह कर्जांचे हप्ते भरल्यासंदर्भातदेखील या निवेदनात उल्लेख आहे.

## भूमिका कायमची गेली तरी बँकेने पैसे भरुन घेतलेच

घर विकण्याच्या प्रकरणात भूमिका या जगाशी निरोप घेऊन कायमची गेली, तरीपण बँकेने गृहकर्जाची थकित साधारण ७० हजार रुपये सोडले नाहीत. घराचा ताबा देताना राहिलेल्या कर्जाचे पैसे तीन दिवसांत भरण्याची मुदत दिली होती. दरम्यान, मृत भूमिकेच्या वडिलांनी ते गुरुवारीच भरुन टाकल्याचे सांगण्यात आले.

## मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाईसाठी पाठपुरावा

मृत भूमिकेच्या मृत्यूला लक्ष्मण डांबर, संजय कुमार,सलीम जावेद हे बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकारी कारणीभूत आहेत, त्यांच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात रितसर तक्रार देऊन त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे मृत भूमिकेचे मामा अमोल माने यांनी 'सुराज्य' ला सांगितले.



सोलापूर : येथील आदर्श नगर विडी घरकुल येथे मृत भूमिकेच्या प्रकरणावरुन जमलेल्या नातेवाईकांच्या गर्दीवेळी विजापूर नाका तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी चर्चेतून मध्यस्थी करताना.

### काही ठळक नोंदी...

- ✔ पाच भाषा अवगत असणारी भूमिका ही घरात होती सर्वात हुशार
- ✔ घराचा ताबा दिल्यानंतर सायंकाळी अक्कलकोट रस्त्यावर स्मशान- भूमीत भूमिकेच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार
- ✔ मृत्यूपूर्वी ताप आणि थंडीच्या आजावरचे उपचार घेण्यासाठी भूमिका होती सिव्हील हॉस्पीटलमध्ये दाखल
- ✔ बँक अधिकाऱ्यांनी पोलीस बळाचा वापर करुन प्रकरण दाबल्याचा नातेवाईकांचा आरोप

### नातेवाईक अमोल गायकवाडांची माहिती...

- ▸▸ सन २०१८ मध्ये ३० लाखांचे घेतले होते गृहकर्ज
- ▸▸ जुळे सोलापूर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेने दिले होते कर्ज
- ▸▸ बँकेने एकूण ३६ लाख ६० हजार दाखविले थकित कर्ज
- ▸▸ मागील दोन महिन्यात ९८ टक्के म्हणजे ३६ लाख भरले होते
- ▸▸ केवळ ६० हजार रुपये राहिले होते भरायचे
- ▸▸ राहिलेली रक्कम भरण्यासाठी गेल्यानंतर समजले घराचा झाला लिलाव
- ▸▸ लिलावाद्वारे घर विकण्यावरुन बँक अधिकाऱ्यांचे एकमेकांकडे बोट
- ▸▸ बँकेने शुद्ध फसवणूक करुन आकसाने विकले घर
- ▸▸ जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊनदेखील नाही मिळाला न्याय

### प्रिय घरासाठी 'भूमिके'चे बलिदान, कुंटुंबियांचा हुंदका थांबता थांबेना

वाघमारे कुटुंबातील भूमिका ही अत्यंत हुशार आणि प्रेमळ होती. तशी घरातील आई-वडील, आजी-आजोबा यांच्यासह भाऊ, बहीण सगळ्यांसह नातेवाईकांची लाडकी होती. घर विकण्याच्या धक्क्यातून तिचा जीव गेला, घरासाठी तिचे बलिदान गेले, याबद्दल घरातल्या सगळ्यांना खूप दु:ख झालंय. घरातील सदस्यांचा हुंदका थांबायचे नाव घेत नाही, असे नातेवाईकांनी सांगितले.

- ● पोलीस आणि बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकाऱ्यांची पळापळ
- ● कर्जदार वाघमारे कुंटुंबियांसह नातेवाईकांची समजूत काढताना नाकेनऊ
- ● 'खाकी' वर्दीच्या मध्यस्तीने अखेर निघाला तोडगा
- ● घराचे टाळे काढून बँकेने दिला ताबा

मृत भूमिका प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, बँक ऑफ महाराष्ट्र जुळे सोलापूर शाखेची बाजू जाणून घेण्यासाठी बँक अधिकारी लक्ष्मण डांबरे यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न गुरुवारी रात्री उशीरापर्यत केला. मात्र त्यांचा संपर्क झाला नाही. सुरवातीला त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर काही वेळाने फोन बंद करुन ठेवला. त्यामुळे याप्रकरणात बँकेची बाजू समजू शकली नाही.

# करमाळा येथे घरात महिलेस घुसून मारहाण

## सवत आणि तिच्या नातेवाईकावर गुन्हा

✔ **सोलापूर** : सवतेसोबत झालेले भांडण मिटवण्यासाठी येऊन चौघांजणांनी महिलेस खाली पाडून लाथाबुक्क्याने मारहाण करीत जखमी केले.ही घटना करमाळा येथील कुंकूगल्ली बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिसांनी जखमीची सवत आणि तिच्या नातेवाईकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माधुरी विजय साळुंखे (वय २५) आणि त्यांचे पती विजय साळुंखे (दोघे रा.कुंकू गल्ली) अशी जखमीची नावे आहेत. यासंदर्भात माधुरी साळुंखे यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांची सवत चैताली विजय साळुंखे (रा.मेन रोड करमाळा), बाबा शंकर पवार, गौरी गोपीनाथ पवार आणि मंगल शंकर पवार (सर्व रा.वाणी प्लॉट बार्शी) यांच्यावर गुन्हा दाखल केला. हवालदार आरकिले पुढील तपास करीत आहेत.

# प्रभारी उपअभियंत्याला लाच घेताना पकडले

## करमाळ्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

✔ करमाळा/प्रतिनिधी

तालुक्यातील विविध कामांचे बिल काढण्याचा मोबदला म्हणून लाचेची मागणी करून ती स्वीकारताना जिल्हा परिषदेच्या करमाळा बांधकाम विभागाच्या प्रभारी उपअभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले आहे. गुरुवार, २७ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास सोलापूर युनिटने (पुणे परिक्षेत्र) ही कारवाई केली. बबन हिरालाल गायकवाड (वय-५७) असे उपअभियंत्याचे नाव आहे.

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे नागरिकांना आवाहन

सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणाऱ्या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या करमाळा बांधकाम विभागात शाखा अभियंता आणि प्रभारी उपअभियंता बबन हिरालाल गायकवाड यांनी तालुक्यातील रस्ते सुधारणा कामाचे बिल काढण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरकडे सुपरवायझर म्हणून असलेल्या तक्रारदाराकडे ३० हजार लाचेची मागणी केली होती. तडजोडअंती गायकवाड यांनी २० हजार लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते. गुरुवारी लाचेची रक्कम स्विकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी गायकवाड यांना रंगेहात पकडल.

ही कारवाई पथकातील पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले (लाप्रवि, सोलापूर), अंमलदार पो.हे.कॉ. प्रमोद पकाले, पो.कॉ. राजू पवार, पो.कॉ. रवि हटखिळे, चालक पो.कॉ. शाम सुरवसे यांनी ही कारवाई केली.

# निमगाव येथे घरफोडी; साडेतीन लाखांचे दागिने लंपास

✔ **सोलापूर** : तालुक्यातील निमगाव येथे एका शेतकऱ्याच्या आतुन बंद असलेल्या दरवाजाची चौकट कापत कोंडी उचकटून चोरट्याने फर्निचरच्या ड्रॉव्हर मधील रोख रकमेसह ३ लाख ४१ हजार रुपयाचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात सोमनाथ चंद्रकांत मगर (रा. निमगाव) यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. ते नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्रीच्या सुमारास जेवण करून आपल्या कुटुंबासहित घरात झोपले होते. रात्री अकरानंतर चोरट्याने बाहेरील दरवाजाची चौकट कापून आतून बंद असलेली कोंडी उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर फर्निचर तसेच लॉकरमध्ये ठेवलेले २ लाख ३१ हजार रुपये रोख आणि ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पोबारा केला. बुधवारी पहाटे पाचच्या सुमारास सोमनाथ मगर यांना जाग आली. तेंव्हा त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास फौजदार शेळके करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कडक शिक्षा, जिवांची रक्षा!

संगम श्री डे
160-73-346

संगम श्री नाईट
569-05-258

कल्याण
890-79-289

मुंबई
277-60-145

# बाजार समितीचा मार्ग यंदा समर्थ नगरीतून जाणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक यंदा वेगळेच वळण धरत आहे. निवडणुकीचे वळण उत्तर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि मोहोळ मतदार संघ नसून अक्कलकोट विधानसभा मतदार संघाकडे जात आहे. वर्षानुवर्षे दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर व मोहोळमध्येच या निवडणुकीची मोर्चेबांधणी व्हायची पण आता कूस बदलली आहे. बाजार समितीच्या निवडणुकीचे नेतृत्व अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे दिल्याने इच्छुकांच्या स्वामी समर्थ नगरीकडे वाऱ्या वाढल्या आहेत.**

मार्केट कमिटीच्या नाड्या आ.कल्याणशेट्टींकडे देवून भाजप श्रेष्ठींनी दोन देशमुखांना पुन्हा दणका दिल्याचे मानले जात आहे. या समितीवर अनेक वर्षे काँग्रेसने वर्चस्व प्रस्थापित केलेले होते. आमदार विजय देशमुख यांच्या रूपाने काही वर्षे ही समिती भाजपकडे आली आहे.आतापर्यंत या निवडणुकीची रणनिती दक्षिण आणि उत्तर मधीलच नेते ठरवत असत पण महायुतीच्या सरकारने ही मार्केट कमिटी ताब्यात घ्या, असे फर्मान सोडले आहे.त्याची जबाबदारी सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर सोपवली आहे. त्यामुळे आता अक्कलकोटमधून बाजार समितीची रणनिती होत आहे. विशेष म्हणजे राज्यात भाजपची सत्ता असल्याने इच्छुकांचा ओढा भाजपकडे असल्याचे दिसून येत आहे. एकेकाळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे सोलापूर बाजार समितीमध्ये वर्चस्व होते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बाजार समिती निवडणूक लागून आठ- दहा दिवस झाले तरी शिंदे कुटुंबियांपैकी कोणीही यात इंटरेस्ट दाखवला नाही. दुसरीकडे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे हेही निवडणुकीपासून चार हात लांबच आहेत. सोलापूरची बाजार समिती म्हणजे काँग्रेसच्या राजकारणाला भक्कम करणारी मोठी आर्थिक नाडीच मानली जात होती. गेल्या निवडणुकमध्ये शेतकऱ्यांच्या मतदानातून भाजपच्या बड्या नेत्यांचा बाजार समितीत प्रवेश झाला आहे.




### मिल जुल के चलो; आघाडीतील नेत्यांची भूमिका

बाजार समितीचे विद्यमान राजकारण पाहता भाजपची ताकद फार नाही. समजा या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला तर काही महिन्यातच बाजार समितीचे रुपांतर राष्ट्रीय बाजारमध्ये होईल अशी भीती उत्तर व दक्षिण मधील नेत्यांना वाटू लागली आहे.मात्र युतीमधून आघाडी झाली तर कदाचित मिल जुल के खुर्ची शाबूत ठेवता येऊ शकते याची ही शक्यता वर्तवली जात आहे.

## इच्छुकांचा ओढा भाजपकडे

### तीन दिवसात २०९ इच्छुकांचे अर्ज दाखल; आज उमेदवारी दाखलचा शेवट दिवस

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी उत्तर दक्षिणसह सोलापूर शहर व अक्कलकोट मधील सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे आजी माजी चेअरमन, सदस्य,विविध राजकीय पक्षचे नेत्यांनी गुरूवारी उमेदवारी सादर केली आहे. तीन दिवसात ७८७ अर्ज विक्री झाली असून २०९ इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर केले. शुक्रवारी उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. गुरूवारी पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, माजी व्हाईस चेअरमन श्रीशैल नारोळे, माजी सभापती इंदुमती पाटील, भारत जाधव, उत्तर तालुका काँग्रेसचे शालिवाहन माने, सचिन गुंड यांच्यासह ४७ जणांनी अर्ज दाखल केले.

CMYK